सहाय्यक प्रशासन अधिकारी गट-क संवर्गातील कर्मचा-यांच्या सर्वसाधारण बदल्या व नेमणूका करणेबाबत.
प्रशासकीय बदली २०२२

जिल्हा परिषद अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-३/२२२२/२५५/२०२२
अहमदनगर दिनांक०७/०५/२०२२

वाचा - १. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र.-११२/आस्था- १४ दि. १५/०५/२०१४.
२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडिल शासन शुध्दीपत्रक क्रं.जिपब-४१४/ प्र.क्रं.११२/आस्था-१४, दि. ०२/०७/२०१४
३. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.जिपब-८१७/प्र.क्र. २२८/आस्था-१४ दि. ०७/०३/२०१९.
४. ग्रामविकास विभागाकडील पत्र क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२२६/आस्था-१४ दिनांक ११ मे २०२२
५. सर्वसाधारण बदल्यांचे इतिवृत्त दिनांक १७/०५/२०२२

शासनाकडील संदर्भ क्रमांक १ च्या निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार,संदर्भ क्रमांक २ व ३ अन्वयेचे शुध्दीपत्रक व तद्अनुषंगिक निर्णयातील तरतुदीनुसार, तसेच संदर्भ क्र. ४ च्या शासन पत्रान्वये बदल्या करण्यास दिलेल्या परवानगीनुसार जिल्हा परिषदेअंतर्गत सामान्य प्रशासन विभागाच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या सहाय्यक प्रशासन अधिकारी गट-क या संवर्गातील कर्मचा-यांच्या समुपदेशनाने त्यांच्या नावा समोरील रकाना क्रमांक ४ येथून रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी **प्रशासकीय** बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

अ.क्र.	कर्मचा-याचे नांव	पदनाम	सध्याचे कार्यरत ठिकाण	प्रशासकीय बदलीने द्यावयाचे ठिकाण	बदलीचा प्रकार
१	२	३	४	५	६
१	श्री.साळुंके महेश सखाहारी	सहाय्यक प्रशासन अधिकारी	ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर	पंचायत समिती पारनेर	प्रशासकीय

वरील कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी हजर होणेकामी दिनांक ३१/०५/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ मधील प्रकरण-१ मुद्दा क्र. ७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन दिनांक ०१/०६/२०२२ नंतर वेतन व भत्ते अदा करु नयेत अन्यथा पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजू न झाल्यास, अनुउपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल.

तसेच बदली ही संपुर्ण प्रशासकीय बाब असल्याने कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ६ (५) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. सदर बदली प्रशासकीय कारणास्तव झाली असल्याने संबधीतांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक **२०२२०५१८०४०७०० असा आहे.**

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्री.साळुंके महेश सखाहारी ,सहाय्यक प्रशासन अधिकारी
द्वारा कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर.

प्रत – कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर.

२/- उपरोक्त बदली झालेल्या कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधीताचे वेतन दिनांक ०१/०६/२०२२ नंतर अदा करु नये, तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत - गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर
प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर
प्रत:- निवड नस्ती

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर